## संक्षिप्त

### उन्नाव बलात्कार पीडितेच्या मृत्युप्रकरणी आरोपपत्र दाखल

**उन्नाव :** उन्नाव बलात्कार पीडितेच्या मृत्युप्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी येथील न्यायालयात बुधवारी आरोपपत्र दाखल केले आहे. या पीडितेला पाच आरोपींनी जिवंत जाळले होते. बुधवारी आरोपपत्र दाखल करण्यात आल्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक विनोदकुमार पांडे यांनी सांगितले. पाच आरोपींविरुद्ध पुरेसे पुरावे आहेत आणि त्यावर आधारित आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे, असे पांडे यांनी सांगितले. पीडित युवती न्यायालयात हजर राहण्यासाठी रायबरेली येथे जात असताना ५ डिसेंबर रोजी तिला आरोपींनी वाटेतच अडवून पेटविले होते. त्यामध्ये ९० टक्के भाजलेल्या पीडितेचा ६ डिसेंबर रोजी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता.

### हिलरी क्लिंटन क्वीन्स विद्यापीठाच्या चान्सलर

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या माजी परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन यांची बेलफास्टमधील क्वीन्स विद्यापीठाच्या पहिल्या महिला चान्सलर म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे गुरुवारी घोषित करण्यात आले. हिलरी यांना ऑक्टोबर २०१८ मध्ये क्वीन्स विद्यापीठाची मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली होती. त्या विद्यापीठाच्या ११ व्या चान्सलर असून १ जानेवारी २०२० पासून पुढील पाच वर्षांसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### काश्मीरमध्ये बस दरीत कोसळून ७ जण ठार

**जम्मू :** काश्मीरमध्ये बस दरीत कोसळून ७ जण ठारजम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात गुरुवारी एक बस रस्त्यावरून घसरून खोल दरीत कोसळल्याने सात जण ठार, तर २४ जण जखमी झाले. ही बस सुरनकोटहून जम्मूकडे जात असताना राजौरी जिल्ह्यातील सियोत-लंबारी येथे हा अपघात घडला. जखमींपैकी काहींना विशेष उपचारांसाठी जम्मूच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

### एकता, रवी शेखर यांच्यासह ५६ जणांना जामीन

**वाराणसी :** सुधारित नागरिकत्व कायदा आणि एनआरसी यांच्याविरोधात दोन आठवड्यांपूर्वी आंदोलन केल्याबद्दल अटक करण्यात आलेल्या कार्यकर्त्या एकता शेखर व त्यांचे पती रवी शेखर यांच्यासह ५६ जणांना एका न्यायालयाने जामीन दिला आहे. यामुळे एकता यांची त्यांच्या सव्वा वर्षाच्या मुलीशी पुन्हा भेट झाली आहे. शेखर दाम्पत्य 'क्लायमेट अॅजेंडा' नावाची पर्यावरणविषयक स्वयंसेवी संस्था चालवते. त्यांना अटक झाल्यानंतर त्यांची लहान मुलगी चंपक ही एकटीच राहिल्यामुळे अनेकांनी चिंता व्यक्त केली होती. मेहमूरगंज येथील या दाम्पत्यासह ५६ जणांना वाराणसीच्या अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी प्रत्येकी २५ हजारांच्या हमीवर जामीन मंजूर केला.

### फैझ यांच्या कवितेचे वाचन केल्याविरोधात तक्रार

**कानपूर :** जामिया मिलिया इस्लामियातील विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी आयआयटी-कानपूर संकुलात विद्यार्थ्यांनी फैझ अहमद फैझ यांच्या 'हम देखेंगे' या कवितेचे वाचन केल्याविरुद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी आयआयटी-कानपूरने एक समिती स्थापन केली आहे, असे संस्थेचे उपसंचालक मणिंद्र अग्रवाल यांनी सांगितले. या वेळी 'हम देखेंगे' या कवितेचे वाचन आयआयटी-कानपूरच्या एका विद्यार्थ्याने केले त्याविरुद्ध हंगामी प्राध्यापक डॉ. वशिमन्त शर्मा व अन्य १६ जणांनी तक्रार केली होती.

### तैवान हेलिकॉप्टर दुर्घटनेत लष्करप्रमुखांसह ८ ठार

**तैपेई :** तैवानमध्ये गुरुवारी एक हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या दुर्घटनेत तैवानचे लष्करप्रमुख ठार झाल्याचे संरक्षण मंत्रालयाने सांगितले. तैपेईजवळच्या डोंगराळ भागात ब्लॅक हॉक हेलिकॉप्टर कोसळले त्यामध्ये लष्करप्रमुख शेन यी-मिंग यांच्यासह लष्करातील आठ उच्चपदस्थ अधिकारी ठार झाले. ईशान्येकडील यीलन परगण्यांमधील सैनिकांना भेटण्यासाठी लष्करप्रमुख आणि त्यांचे सहकारी जात असताना ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेतून पाच जण बचावले आहेत.

# राजकारण करण्याऐवजी मृत बालकांच्या मातांना भेटायला हवे होते

## योगी आदित्यनाथ, मायावती यांची प्रियंका गांधींवर टीका

**पीटीआय, लखनौ**

**राजस्थानच्या कोटा** शहरातील एका सरकारी रुग्णालयात डिसेंबरमध्ये १०० नवजात बालके मृत्युमुखी पडल्याच्या घटनेचे राजकीय पडसाद उत्तर प्रदेशात उमटले आहेत. काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी उत्तर प्रदेशात 'राजकारण करण्याऐवजी' नवजात बालकांच्या मातांना भेटायला जायला हवे होते, अशा शब्दांत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि बसपच्या प्रमुख मायावती यांनी गुरुवारी त्यांच्यावर हल्ला चढवला.

सुधारित नागरिकत्व कायद्याच्या विरोधात उत्तर प्रदेशात हिंसक निदर्शने झाल्यानंतर प्रियंका यांनी राज्याचा जो दौरा केला होता, त्याचा संदर्भ या नेत्यांच्या वक्तव्यात होता.

कोटाच्या जे के लोन रुग्णालयात गेल्या महिन्यात किमान १०० बालमृत्यू झाल्याच्या घटनेबाबत प्रियंका यांनी मौन पाळल्याबद्दल भाजपच्या इतर नेत्यांनीही त्यांच्यावर टीका केली आहे. याच वेळी, या मृत्यूंचे राजकारण केले जाऊ नये, असे आवाहन राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनी गुरुवारी ट्विटरवर केले. स्वतः महिला असूनही काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधी व सरचिटणीस प्रियंका गांधी यांना कोटा येथील मातांचे दुःख जाणवले नाही, अशा शब्दांत आदित्यनाथ यांनी त्यांना लक्ष्य केले.

'१०० निष्पाप बालकांचा मृत्यू ही सुसंस्कृत समाजावरील ठपका आहे. मात्र महिला असूनही सोनिया गांधी व प्रियंका गांधी या दोघीही बालकांच्या मातांची व्यथा समजून घेण्यास असमर्थ आहेत, ही अतिशय दुःखाची बाब आहे,' असे हिंदीतून केलेल्या अनेक ट्वीटमध्ये मुख्यमंत्री म्हणाले. प्रियंका यांनी उत्तर प्रदेशात राजकारण करत राहण्यापेक्षा राजस्थानातील मातांना भेटून त्यांचे सांत्वन केले असते, तर अधिक बरे झाले असते, असेही आदित्यनाथ म्हणाले. यापूर्वी, बसपच्या प्रमुख मायावती यांनीही प्रियंका यांच्यावर टीका केली. प्रियंका मुलांच्या मातांना भेटल्या नाहीत, तर उत्तर प्रदेशातील सुधारित नागरिकत्व कायद्याच्या विरोधातील हिंसाचाराचे बळी ठरलेल्यांच्या नातेवाईकांची त्यांनी घेतलेली भेट ही केवळ 'नौटंकी' असल्याचे मानले जाईल, असे त्या म्हणाल्या.

१०० बालकांचे झालेले मृत्यू अतिशय दुःखदायक आहेत. मुख्यमंत्री अशोक गहलोत व त्यांचे सरकार अतिशय असंवेदनशील व बेजबाबदार असून ही बाब अतिशय निषेधार्ह आहे, असेही मायावतींनी सांगितले. दरम्यान, जोधपूरच्या अ. भा.आयुर्विज्ञान संस्थेतील तज्ज्ञ आणि आरोग्य अर्थतज्ज्ञ यांचा समावेश असलेला एक उच्चस्तरीय चमू कोटा येथे पाठवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या रुग्णालयाला तांत्रिक मदत किंवा साहाय्य पुरवण्यास केंद्र सरकार तयार असल्याचे केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन म्हणाले.

## डीआरडीओच्या युवा विज्ञान प्रयोगशाळा देशाला समर्पित

**पीटीआय, बंगळूरु**

**संरक्षण संशोधन** आणि विकास संघटनेने (डीआरडीओ) स्वतःला नव्या विचाराने आणि आकाराने सुसज्ज करून २१ व्या शतकात युवाशक्तीला बरोबर घेऊन दहशतवादाची झळ बसलेल्या देशांना सहकार्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले.

भारताचे सामर्थ्य काय असेल आणि जगाच्या नकाशामध्ये आपले स्थान कोठे असेल ते ठरविणारे हे दशक आहे, त्याचप्रमाणे हे दशक युवाशक्तीचे असेल, असेही पंतप्रधान म्हणाले. डीआरडीओच्या पाच युवा विज्ञान प्रयोगशाळा देशाला समर्पित केल्यानंतर ते बोलत होते. मुंबईसह बंगळूरु, हैदराबाद, चेन्नई व कोलकाता येथे या प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. तेथे ३५ वर्षांखालील शास्त्रज्ञांना संशोधन आणि विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्राधान्य दिले जाणार आहे. शास्त्रज्ञांना दहशतवादाच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर जगाची सेवा करण्याचीही संधी मिळणार आहे याचे मोदी यांनी शास्त्रज्ञांना स्मरण करून दिले.

## दिल्लीतील बॅटरीच्या कारखान्याला आग

# अग्निशामक दलाचा एक जवान ठार

## १४ जण जखमी, दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी

**पीटीआय, नवी दिल्ली**



**तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे :** पीरगढी परिसरात बॅटरीच्या कारखान्याला लागलेल्या आगीचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले.

**दिल्लीच्या पीरा** गढी परिसरातील बॅटरीच्या एका कारखान्यात गुरुवारी सकाळी आग लागून स्फोट झाला त्यामुळे कारखाना कोसळून झालेल्या दुर्घटनेत अग्निशामक दलाचा एक जवान ठार झाला, तर अन्य १४ जण जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

कारखान्याच्या इमारतीची काळजी घेणारे दोन जण आणि एका सुरक्षारक्षकासह १८ जणांची सुटका करण्यात आली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेला अग्निशामक दलाचा जवान अमित बालयन (२०) रुग्णालयात उपचारादरम्यान मरण पावला.

अग्निशामक दलाचे जवान आग आटोक्यात आणत असताना या कारखान्याच्या दोन मजली इमारतीचा मोठा भाग स्फोटानंतर कोसळला. आग नियंत्रणात आणण्यात आली आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या अग्निशामक दलाच्या सर्व जवानांना बाहेर काढण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आगीने इमारतीला वेढले त्या वेळी स्फोटांचे अनेक आवाज झाल्याचे ही घटना पाहणाऱ्यांनी सांगितले. इमारतीमध्ये अग्निशामक दलाचे जवान अडकले होते त्या सर्वांना बाहेर काढण्यात आले असले तरी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे तर अन्य जवानांच्या प्रकृतीचा धोका टळला आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दिल्लीचे नायब राज्यपाल अनिल बैजल आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अमित याच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. दिल्लीचे गृहमंत्री सत्येंद्र जैन यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि या घटनेची दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि नागरी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

# काश्मीरमधील सरकारी रुग्णालयांमध्ये इंटरनेट सेवा सुरू

**पीटीआय, जम्मू**

**काश्मीर खोऱ्यात** आरोग्य विभागाशी संलग्न आरोग्य केंद्रे व कार्यालये यांसह ८० सरकारी रुग्णालयांमध्ये ब्रॉडबँड इंटरनेट सेवा गुरुवारी सुरू करण्यात आल्याचे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे खोऱ्यातील रुग्ण, तसेच आरोग्य सेवा व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.

केंद्र सरकारने ४ ऑगस्टच्या रात्री काश्मीर खोऱ्यातील इंटरनेट सेवा स्थगित केल्या होत्या. खोऱ्यातील लोकांना नववर्षाची भेट म्हणून सरकारी रुग्णालयांमध्ये ३१ डिसेंबरच्या रात्रीपासूनच इंटरनेट सेवा सुरू करण्यात येणार होत्या, मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे त्या सुरू होऊ शकल्या नाहीत, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. श्रीनगरमधील चेस्ट डिसीज हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सलीम ताक यांनी रुग्णालयात इंटरनेट सुरू झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. श्रीनगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न आठपैकी सात रुग्णालयांमध्ये इंटरनेट सुरू झाल्याच्या वृत्तावर प्राचार्य परवेश शाह यांनीही शिक्कामोर्तब केले.

# नववर्षदिनी भारतात सर्वाधिक बालकांचा जन्म

**पीटीआय, संयुक्त राष्ट्रे**

**जगात** १ जानेवारी २०२० रोजी जवळपास चार लाख बालकांचा जन्म झाला त्यापैकी सर्वाधिक म्हणजे ६७ हजार ३८५ बालकांचा जन्म भारतात झाला, असे युनिसेफने म्हटले आहे.

नववर्षदिनी जगात तीन लाख ९२ हजार ०७८ बालकांचा जन्म झाला. त्यापैकी सर्वाधिक म्हणजे ६७ हजार ३८५ बालकांचा जन्म भारतात झाला. त्यापाठोपाठ चीनमध्ये ४६ हजार २९९ बालकांचा जन्म झाला, असे युनिसेफतर्फे सांगण्यात आले.

# राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते डी.पी. त्रिपाठी यांचे निधन



**नवी दिल्ली :** राजकीय कुशाग्र बुद्धी आणि व्यवहारज्ञानाबद्दल परिचित असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि सरचिटणीस डी. पी. त्रिपाठी यांचे गुरुवारी येथे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून ते पक्षासोबत होते आणि राष्ट्रीय स्तरावर त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. दिल्लीच्या राजकीय वर्तुळात विद्वान व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्रिपाठी यांनी विद्यार्थी नेते म्हणून कारकीर्दीला सुरुवात केली. आणीबाणीच्या काळात त्यांनी कारावासही भोगला होता. अलाहाबाद विद्यापीठातराज्यशास्त्राचे प्राध्यापकही होते. माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांचे निकटवर्तीय ते राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार आणि विविध पक्षांतील नेत्यांशी त्यांचे जवळचे संबंध होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी त्रिपाठी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

**MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION**
(Autonomous) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)
4th Floor, Government Polytechnic Bldg, 49, Kherwadi, Bandra (East), Mumbai - 400051.
Tel.: 26475077(O) 26477209(P) Fax: 91-022-26473980 Email: secretary@msbte.com Website: www.msbte.com

No.MSBTE/D-60/First Extension/2019/072 Date: 02/01/2020

**Second Extension to E-Tender**
**Tender No.: MSBTE/TENDER/2019/09**

Submission of Tender No. **MSBTE/TENDER/2019/09** for Providing, Supplying, Erecting, Commissioning & Maintaining Elevators in New Administrative Building of MSBTE at Pune is extended till **09/01/2020**. Detail Instructions, Specifications & Quantity are given in Tender document. Bidding documents can be seen, downloaded & submitted from website **https://mahatenders.gov.in** till **09/01/2020 up to 11:00 a.m.**

Sd/-
**Secretary**
**M.S. Board of Technical Education, Mumbai**

**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
Ministry of MSME (Govt. of India)
सी.बी.कोरा इंस्टीट्यूट, शिंपोली गाव, म्युनिसिपल शाळेसमोर, बोरीवली (पश्चिम)

**बेसिक बेकींग कोर्स**
**अॅडव्हान्स बेकींग कोर्स**
**दि.०७/०१/२० ते २७/०१/२०**
केक, कुकीज, ब्राऊनिज, पफ, फ्रॉडन्ट केक, कपकेक, डेझर्ट, ब्रेडस् इ. व्यवसाय मार्गदर्शन
**सुसज्ज एसी क्लासरुम**
स्थळ : टोपीवाला सेंटर, गोरेगाव पश्चिम
**संपर्क : शेफ रिया कामत**
9699563599/7303663599
022-28988581
२५ लाखाची कर्ज योजना अनुदाना सहीत

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ मुंबई ४०००५१.**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता मंडळामार्फत राबविण्यात येत असलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम नव्याने सुरू करणेसाठी इच्छुक नोंदणीकृत संस्थांकडून / व्यवस्थापनांकडून तसेच यापूर्वी मान्यता दिलेल्या संस्थांकडून ऑनलाइन अर्ज मागविणेबाबत.**

| अ. क्र. | बाब | अर्ज करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | मंडळाचे अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यासाठी अथवा जुन्या संस्थेत अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ अथवा जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरू करणेसाठी करिता संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा ऑनलाइन अर्ज. | नियमित शुल्कासह शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी दिनांक ०१ जानेवारी २०२० ते २८ फेब्रुवारी २०२० पर्यंत |
| २ | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांस संबंधित व्यवस्थापनाने प्रत्येक वर्षानंतर **www.vti.dvet.in** या वेबसाइटवर नूतनीकरणासाठी ऑनलाइन अर्ज करावे. | |

उपरोक्तबाबत संबंधित ऑनलाइन अर्ज व माहितीपुस्तिका संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, यांच्या **www.vti.dvet.in** या संकेतस्थळावर तसेच माहितीपुस्तिका व इतर माहिती मंडळाचे संकेतस्थळावर **www.msbve.gov.in** उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. माहितीपुस्तिकेच्या आधारे ऑनलाइन अर्ज करण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेशी संपर्क साधावा अथवा मंडळाचे संकेतस्थळ **www.msbve.gov.in** पहावे.

सही/-
**सचिव,**
म. रा. व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई ४०००५१.

डीजीआयपीआर २०१९/२०२०/४३२५

**पश्चिम रेल्वे**
**आरएच गर्डर ४ नगांची निर्मिती व पुरवठा**

कार्यकारी : डीईएन (पूर्व) बीसीटी निविदा सूचना क्र. व तारीख : बीसीटी/१९-२०/३२८ दिनांकित : ३१.१२.२०१९. **काम व ठिकाण** : उधना-जळगाव अनुभाग : आठ (८) मॅन्ड लेव्हल क्रॉसिंग्ज (पीबी २९१/ १८-१९ अंब्रेला) काढून टाकण्याकरिता भुयारी मार्गाची तरतूद करण्यासाठी वापरावयाच्या आरडीएसओ मान्यताप्राप्त फर्मद्वारा आरएच गर्डर ४ नगांची निर्मिती व पुरवठा. **कामाचा अदमासे खर्च** : रु. २,०९,५८,५९७.०२. **इरठे** : रु. २,५४,८००.००. **सादरीकरणाची तारीख व वेळ** : २८.१.२०२० रोजी दु. ३.०० वा. पर्यंत. **उघडण्याची तारीख व वेळ** : २८.१.२०२० रोजी दु. ३.३० वा. निविदा कागदपत्रांची किंमत (ना-परतावा), इरठे, पात्रता कसोट्या, कामाचे तत्सम स्वरूप, सविस्तर निविदा शर्ती समाविष्ट सविस्तर सूचनेसंबंधित माहितीकरिता कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळांना भेट द्यावी. प्रत्यक्ष प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly 12

**TATA**
**टाटा पॉवर**
**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय :
बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४०० ००१.
दूर.: ९१ २२ ६६६५ ८२८२ फॅक्स: ९१ २२ ६६६५ ८८०१
सीआयएन : एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७
ईमेल : tatapower@tatapower.com संकेतस्थळ : www.tatapower.com

**सूचना**

आम्ही आमच्या प्रिय ग्राहकांना असे कळवू इच्छितो की, ग्राहक हक्क विवरणाची एक प्रत विनाशुल्क आमच्या बिलिंग सेंटर्सकडे उपलब्ध आहे. तसेच डाऊनलोड करता येण्यासारख्या नमुन्यात टाटा पॉवरच्या **www.tatapower.com** या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध आहे. **(Regulations >> Licence Area Mumbai >> Consumer Rights Statement).** ही सूचना एमईआरसीच्या निदेशाशी अनुरूप निर्गमित करण्यात आली आहे.

**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड**

**SBI**
प्लॅटफॉर्म इंजिनिअरिंग-I विभाग, स्टेट बँक ग्लोबल आयटी केंद्र, सेक्टर-11, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - 400 614.

**इच्छुकतेची अभिव्यक्ती (ईओआय)**

भारतीय स्टेट बँक ही एंटरप्राइज बल्क ईमेल सोल्यूशनच्या खरेदीसाठी 'इच्छुकतेची अभिव्यक्ती' मागवत आहे. तपशीलवार ईओआय कागदपत्रे बँकेच्या **https://bank.sbi** वेबसाइटवर '**प्रोक्युरमेंट न्यूज**' अंतर्गत उपलब्ध आहेत.

**स्थळ:** नवी मुंबई
**दिनांक:** 03.01.2020

स्वाक्षरी
उप महाप्रबंधक
(प्लॅटफॉर्म इंजिनिअरिंग-I)

**पश्चिम रेल्वे**
**कमी उंचीच्या भुयारी मार्गाचे बांधकाम**

उप मुख्य अभियंता (बांधकाम) १, पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा-३९०००४ हे खाली दिलेल्या तपशिलानुसार ई-निविदा मागवीत आहेत. **ई-निविदा क्र.: डेप्यू. सीई / सी / आय / बीआरसी / ४९९ कामाचे नाव**: वडोदरा विभागाच्या देरोल-खारसालिया स्थानकांदरम्यान किमी ४४५ / २०-२२ कडील एलसी नं. ३२ ऐवजी कमी उंचीच्या भुयारी मार्गाचे बांधकाम. **कामाचा अदमासे खर्च**: रु. ३५४.५९ लाख. **इरठे**: रु. ३,२७,३००/-. **बोलीकरिता ऑनलाइन निविदेची उपलब्धता**: ०६.०१.२०२० रोजी स. ११.०० वा.पासून ते २०.०१.२०२० रोजी दु. ०३.०० वा.पर्यंत. **निविदा उघडण्याची तारीख**: २०.०१.२०२० रोजी दु. ०३.३० वा. निविदा कागदपत्रांची किंमत (ना-परतावा), इरठे, पात्रता कसोट्या, कामाचे तत्सम स्वरूप, सविस्तर निविदा शर्ती समाविष्ट सविस्तर सूचनेसंबंधित माहितीकरिता कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळांना भेट द्यावी.
**प्रत्यक्ष प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.**

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly १५

**"बेटी बचाओ बेटी पढाओ"**
**भारत सरकार**
**अखिल भारतीय शारीरिक औषधे व पुनर्वसन संस्था मुंबई-४०००३४.**

**असिस्टंट प्रोफेसर (पीएमआर)च्या दोन पदांच्या कंत्राटी नियुक्तीकरिता अधिसूचना**

अखिल भारतीय शारीरिक औषधे व पुनर्वसन संस्था, मुंबई येथे एक वर्षाच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्त्वावर असिस्टंट प्रोफेसरच्या (शारीरिक औषधे व पुनर्वसन) यूआर प्रवर्गाची २ (दोन) पदे भरण्याचा प्रस्ताव आहे.

**एकत्रीकृत पारिश्रमिक**: रु. ९५,०००/-

अधिक तपशिलाकरिता **www.aiipmr.gov.in** या संस्थेच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**संचालक**

डीएव्हीपी १७१३४/११/०००३/१९२०

**नवी मुंबई महानगरपालिका**

**अभियांत्रिकी विभाग**

**फेर-निविदा सूचना क्र. नमुंमपा/श.अ./ 417 /2019-20**

**कामाचे नांव** :- घणसोली क्षेत्रातील गावठाणातील रस्त्यांची थीन व्हाईट टॉपींग (T.W.T.) पध्दतीने सुधारणा करणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. 4,89,79,162/-**

या निविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in आणि www.nmmc.maharashtra.etenders.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही /-
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/1222/2019

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**विद्युत विभाग**

निविदा सूचना क्रमांकः-ठा.म.पा./विद्युत/नि.सू./88/19-20.

वडाळा कासारवडवली लाईन-4 मेट्रो प्रकल्प, पॅकेज-11 अंतर्गत तिन हात नाका ते कापूरबावडी जंक्शन पर्यंत मेट्रो प्रकल्पाच्या कामात बाधित होणारे पथदिप काढणे व नवीन पथदिप व्यवस्था करणे अश्या एक (1) कामाकरिता निविदा ई टेंडरिग पध्दतीने दि. 03/01/20 ते दि. 17/01/20 या कालावधीत मागविण्यात येत आहेत. निविदा ई टेंडरिडग पध्दती ने https://mahatenders.gov.in वर दि.17/01/20 पर्यंत दु. 3.00 या वेळेत स्विकारण्यात येतील व दि.18/01/20 रोजी दु. 3.00 वाजता उघडण्यात येईल. निविदेतील इतर अटी शर्थी मूळ निविदा सुचना प्रमाणेच राहतील.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/१३४६/२०१९-२० **सही/-**
दि:०२.०१.२०२० उप नगर अभियंता
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*
**प्लास्टीकमुक्त ठाणे !**

**पश्चिम रेल्वे**
**जुन्या प्लानची फिल्मिंग, डिजिटायझेशन, इ.- मुंबई विभाग**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभियांत्रिकी विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८ हे खाली दिलेल्या तपशिलानुसार ई-निविदा मागवीत आहेत. कार्यकारी : डीईएन (सेंट्रल) बीसीटी निविदा सूचना क्र. व तारीख : बीसीटी/ १९-२०/ ३२९. दिनांकित : ३१.१२.२०१९. **काम व ठिकाण** : मुंबई सेंट्रल- (विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे कार्यालय)- मुंबई विभाग, अभियांत्रिकी विभागाच्या जुन्या प्लानची फिल्मिंग, डिजिटायझेशन, रिस्टोरेशन, रिट्रिव्हल. (बिगर-उपनगर अनुभाग - फेज-१). **कामाचा अदमासे खर्च**: रु. १,२५,५५,०००.००. **इरठे** : रु. २,१२,८००.००. **सादरीकरणाची तारीख व वेळ** : २८.१.२०२० रोजी दु. ३.०० वा.पर्यंत. **उघडण्याची तारीख व वेळ** : २८.१.२०२० रोजी दु. ३.३० वा. निविदा कागदपत्रांची किंमत (ना-परतावा), इरठे, पात्रता कसोट्या, कामाचे तत्सम स्वरूप, सविस्तर निविदा शर्ती समाविष्ट सविस्तर सूचनेसंबंधित माहितीकरिता कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळांना भेट द्यावी. प्रत्यक्ष प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly 11

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
पाणी पुरवठा विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागातील वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.१६ मधील जुनागाव येथे २.५ द.ल.वि.क्षमतेचा जलकुंभ बांधणे व वहन वितरण नेटवर्क अंथरणे कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर दि. ०३/०१/२० दि.१७/०१/२० पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. १७/०१/२० रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.निविदा दि. २०/०१/२० सायं.१६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु -मु/१३४९/१९-२० **सही/-**
दि:०२.०१.२०२० नगर अभियंता
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*
**प्लास्टीकमुक्त ठाणे !**

(लिक्विडेशन मध्ये असलेल्या) गुप्ता एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची
**जमिन आणि प्लॉट / कंपनीच्या मालमत्तेची विक्री**
घुघुस, चंद्रपूर साठी (EOI)

गुप्ता एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडच्या लिक्विडेशनसाठी (एनसीएलटी चा आदेश सीपी नं. 43/IB/NCLT/MAH/2017 दिनांक 26 मार्च 2018 नुसार इंटर आलीयाने लिक्विडेटर म्हणून नियुक्ती केलेली आहे) एनसीएलटीच्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेसंदर्भात. लिक्विडेटर, दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता, 2016 च्या कलम (33 च्या संदर्भात आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन 2017 च्या नियमनासह वाचलेले आहे, कंपनीच्या मालमत्तांच्या विक्रीसाठी इच्छुकांना आमंत्रण आहे जेथे आहे आणि जे काही आधार आहे.

| अ.क | मालमत्ता विवरण | आरक्षित किंमत (रु. लाखांमध्ये) | EMD किंमत (रु. लाखांमध्ये) |
|---|---|---|---|
| 1 | कारखाना जमीन (144.51 एकर), इमारत, प्लॉट आणि मशिनरी आणि इतर | 6937.50 | 35.00 |
| 2 | कारखान्या व्यतीरिक्त जमीन (232.72 एकर) | 3700.00 | 18.50 |

इच्छुक अर्जदार कंपनीच्या प्लांट/मालमत्तांच्या विक्रीसाठी ईओआय आणी आमंत्रणासाठी अटीनुसार ईएमडी शुल्क भरू शकतात. ईओआय च्या विस्तृत नियम व शर्ती साठी वेबसाईट **https://eauction.npasource.com** येथे भेट द्या. किंवा **email liquidator.gepl@gmail.com** वर पाठवा.

**इतर मुद्दे**
1. मान्यताप्राप्त सेवा पुरवठाद्वारे 'आहे त्या स्थितीत', 'आहे त्या ठिकाणहून' आणि 'आहे त्या अवस्थेत' ई लिलाव **NPAsource.com (https://eauction.npasource.com/)** घेण्यात येईल.
2. ही विक्री सूचना ई-लिलाव प्रक्रियेच्या कागदपत्रांसह वाचली जाईल, ज्यात मालमत्तांते संदर्भातील सविस्तर माहिती, ऑनलाईन ई लिलाव निविदा अर्ज, नुकसान भरपाईचे काम, सामान्य अटी-शर्ती व ई-लिलाव विक्रीच्या अटी, संकेतस्थळ **https://eauction.npasource.com** वर किंवा **liquidator.gepl@gmail.com** या ई-मेलवर, संपर्क क्रमांक 91-9860128856 उपलब्ध आहेत.
3. ई-लिलावाची आवश्यक कागदपत्रे खालील दिलेल्या कार्यालयात व्यक्तीश (पत्ता: लेवल 3, लिला विस्टा बिल्डींग, वेस्ट हायकोर्ट रोड, बजाज नगर, नागपूर (440010) किंवा ई-मेलद्वारे 13 जानेवारी, 2020 रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत (IST) सादर करावी.
4. **ई-लिलाव 14 जानेवारी, 2020 रोजी दुपारी 3 ते 5 (IST) दरम्यान होईल.**

दि. : 03.01.2020
स्थळ : नागपूर

विकास प्रकाश गुप्ता
लिक्विडेटर
(गुप्ता एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड - लिक्विडेशन मध्ये)
रजिस्ट्रेशन न.: IBBI/IPA-001/IP-P00501/2017-18/10889

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**विद्युत विभाग**

निविदा सूचना क्रमांकः- ठा.म.पा./विद्युत/नि.सू./१०४/२०१९-२०२०

ठाणे महानगरपालिकेच्या डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहातील मुख्य थियटर स्टेजसाठी वाढीव वातानुकुलीन यंत्रणा बसविणे व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहातील VIP लिफ्टचे नुतनीकरण करणे या दोन कामाकरिता निविदा ई टेंडरिंग पद्धतीने दि. ०२/०१/२० ते दि. १६/०१/२० या कालावधीत मागविण्यात येत आहे. निविदा ई टेंडरिंग पद्धतीने https://mahatenders.gov.in वर दि. १६/०१/२० रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील व दि. १७/०१/२० रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येईल. निविदा सूचना व निविदा प्रपत्र येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/१३५४/२०१९-२० **सही/-**
दि:०२.०१.२०२० उप नगर अभियंता
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*
**प्लास्टीकमुक्त ठाणे !**

**पश्चिम रेल्वे**
**विविध कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभियांत्रिकी विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८ हे खाली दिलेल्या तपशिलानुसार ई-निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कार्यकारी | निविदा सूचना क्र. व तारीख | काम व ठिकाण | कामाचा अदमासे खर्च (रु.) | इरठे (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | डीईएन (उत्तर) बीसीटी | बीसीटी/१९-२०/ ३२५ दि. ३१.१२.२०१९ | विरार-सुरत अनुभागः एडीईएन/ वल्साड (१) टीआरआर(पी)= ७.२७४ किमी टीएसआर(पी)= ७.६८३. (२) थिक वेब स्वीच रिन्यूअल. (३) एडीईएन-बीएलअंतर्गत अनुभागाकरिता रेल्सचे प्रासंगिक नवीकरण. (४) एडीईएन/ वल्साड अनुभागाअंतर्गत एटी वेल्ड कॉलर्स व रेल्सची पेंटीग. | ३,२७,३८,१०८.४७ | ३,१३,७००/- |
| २. | डीईएन (उत्तर) बीसीटी | बीसीटी/१९-२०/ ३२६ दि. ३१.१२.२०१९ | विरार-सुरत अनुभाग :- विविध ठिकाणांवरील म्हणजेच एकूण सीटीआर(पी) = ५.८५४ किमी. सीटीआर(एस) = ३.१०० किमी वरील ३०० एमएम दगडी खडींची डीप स्क्रिनिंग व रिकुपमेंट समाविष्ट १६६० नग/ किमीकडील पीआरसी स्लीपर्सवरील विद्यमान ६० किग्रॅ रेल्वेचे नवीकरण. (२) पी अँड सीची डीप स्क्रिनिंग. (३) टीएफआर = ५६.०४ किमी व टीबीआर = ४.५२३ किमी. (४) एडीईएन/ वल्साड अनुभागाअंतर्गत टी-२८, जेसीबी, क्रेन, इ.चा वापर करून पी अँड सीचे टीबीआर आणि खराब लेआऊट्सची सुधारणा. | ३,१६,५५,३४९.८३ | ३,०८,३००/- |
| ३. | डीईएन (उत्तर) बीसीटी | बीसीटी/१९-२०/ ३२७ दि. ३१.१२.२०१९ | विरार-सुरत अनुभाग :- बारा महिन्यांकरिता एसएसई(वापी) अनुभागाअंतर्गत पी वे'ची दुरुस्ती. | १,९७,४३,६१४.५५ | २,४८,७००/- |

अनु क्र. : १, २ व ३ : **सादरीकरणाची तारीख व वेळ** : २८.१.२०२० रोजी दु. ३.०० वा.पर्यंत. **उघडण्याची तारीख व वेळ** : २८.०१.२०२० रोजी दु. ३.३० वा. निविदा कागदपत्रांची किंमत (ना-परतावा), इरठे, पात्रता कसोट्या, कामाचे तत्सम स्वरूप, सविस्तर निविदा शर्ती समाविष्ट सविस्तर सूचनेसंबंधित माहितीकरिता कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळांना भेट द्यावी. **प्रत्यक्ष प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.**

आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly आम्हाला फॉलो करा twitter.com/WesternRly 13